-५१-

ग्रामपंचायतीच्या बैठकीचे कार्यवृत्त

पंचायती राज समितीची शिफारस

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

परिपत्रक क्र. व्हीपीएम२६८८/१३९५/[३१४१]/२१

मंत्रालय, मुंबई४०० ०३२, दिनांक १७ नोव्हेंबर १९८८

परिपत्रक:- पंचायत राज समितीने सन १९८७-८८ च्या चौदावा अहवाल परिच्छेद क्र. १.६ मध्ये अशी शिफारस केली आहे की, ग्रामपंचायत सभेची प्रत्ये महिन्याची बैठक घेताना पहिल्या बैठकीचे कार्यवृत्त ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दिले जावे व पंचायत समितीला ही ते पाठविले जावे. समितीने अशीही शिफारस केली आहे की, ग्रामसेवकांनी अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी त्यांच्या पदावर रहाण्यास अनर्ह ठरु नयेत यासाठी आवश्यक ती उपाय योजना करावी.

२. पंचायती राज समितीच्या उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, ग्रामपंचायतीच्या प्रत्येक महिन्याची बैठक घेताना पहिल्या बैठकीचे कार्यवृत ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.

३. ग्रामसेवकांनी अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे सरपंचाना मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ७ अन्वये घ्यावयाच्या वार्षिक दोन वैधानिक ग्रामसभा बोलावणे शक्य होत नाही आणि परिणामत: सरपंच/उप सरपंच त्यांच्या पदावर राहण्यास अनर्ह ठरतात. यासाठी सर्व ग्रामसेवकांनी अभिलेख वेळेवर उपलब्ध करुन देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

४. जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सर्व गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांना या प्रकरणी त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दयावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ शुभदा कारेकर ]
कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
3 DEC 1988
शाखा GB/VPC
अ. लि. नि. जिल्हाधिकारी

प्रति,